महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ मर्यादित - स्थापना करण्याबाबत.......

---

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- इमाव १०९६/प्र.क्र. ३९५/विघयो-२,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५ सप्टेंबर, १९९८.

शासन निर्णय :- महाराष्ट्र राज्यात आजमितीस २६० इतर मागासवर्ग जाती आहेत. त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सदर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे अशी सततची मागणी विचारात घेऊन व राज्यातील इतर मागासवर्गीयांची अंदाजे ५२% लोकसंख्या आहे. त्यांच्या आर्थिक उन्नतीच्या योजना राबविण्यासाठी विशेषतः रोजगार व स्वयंरोजगार योजना राबविण्यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्यादृष्टीने राज्यांमध्ये स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन व त्या संदर्भातील केंद्र शासनाच्या सूचना लक्षात घेऊन राज्यातील इतर मागास वर्ग समाजाच्या कल्याणाकरिता एका स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले.

२. त्यानुसार शासन आता राज्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळाच्या" स्थापनेस मंजुरी देत आहे. हे महामंडळ शासनाचा उपक्रम म्हणून कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत करण्यात येईल. तसेच, ही एक फक्त कर्ज देणारी संस्था राहणार नसून ते इतर मागासवर्गीयांसाठी विकास व प्रोत्साहनात्मक कार्य करणारी संस्था असेल व त्यांच्या आर्थिक उन्नतीच्या योजना विशेषतः रोजगार व स्वयंरोजगार योजना राबविणे व त्यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करणे हे या मंडळाचे कार्य राहील. तसेच, महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ५० कोटी रुपये राहील. दरवर्षी या महामंडळाला भागभांडवलापोटी रुपये ५.०० कोटी उपलब्ध करून देण्यात येतील व महामंडळाच्या व्यवस्थापन व इतर खर्चासाठी भागभांडवलातून रुपये पन्नास लाख इतके व्यवस्थापकीय अनुदान देण्यात येईल.

३. महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय मुंबई येथे राहील.

४. संस्थापन नियमावलीनुसार महामंडळाची यथावकाश पुनर्रचना होईपर्यंत महामंडळाचे संचालक मंडळ हे १५ सदस्यांचे राहील व त्यामध्ये पुढील प्रमाणे शासकीय सदस्य राहतील.

१. सह सचिव, कल्याण मंत्रालय, भारत सरकार, शास्त्री भवन, नवी दिल्ली.
२.व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली.
३.सचिव, समाज कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४.संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ मर्या. मुंबई.
६.महाराष्ट्रातील शिखर बँकेचा एक प्रतिनिधी -- पदसिद्ध सदस्य
७.निबंधक सहकारी संस्था यांचा एक प्रतिनिधी -- पदसिद्ध सदस्य.

कृ.मा.प.

५.	तसेच, इतर ८ (आठ) सदस्य हे अशासकीय सदस्य राहतील व त्यांची नियुक्ती शासन करील.

६.	या महामंडळाकरिता नेमण्यात येणाऱ्या कर्मचारीवृंद हा नवीन भरतीद्वारे नियुक्त न करता शासनाच्या इतर महामंडळातील अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून समायोजनाद्वारे नियुक्त करावा.

७.	वित्त विभाग, क्रमांक-शासाऊ १०९१/प्र.क्र. ९१/साऊ, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९१ मधील मार्गदर्शक तत्वांच्या बाहेर जाऊन कोणत्याही अतिरिक्त सोयी-सवलती शासनाच्या मान्यतेशिवाय अनुज्ञेय करण्यात येऊ नयेत.

८.	हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.५९२/९८/साऊ व प्र.क्र.७१३/९८/व्यय-११, दि. २३.०९.१९९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

-स्वाक्षरित /-

(च. रा. गोसावी)
अवर सचिव महाराष्ट्र शासन.

प्रति :-
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे सचिव.
मंत्री, समाज कल्याण यांचे खाजगी सचिव.
राज्यमंत्री, समाज कल्याण यांचे स्वीय सहाय्यक.
राज्यमंत्री, माहिती व जनसंपर्क यांचे स्वीय सहाय्यक.
इतर सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल महाराष्ट्र एक मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी,
सामान्य प्रशासन, विभाग मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्तीय व मागासवर्गीय महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य चर्मोद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई.
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट,मुंबई.
सचिव, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली, (पत्राने)
सर्व राज्याचे मुख्य सचिव, (पत्राने)
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी.
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
निवड नस्ती, का-विघयो -२.